अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील उपसंचालक गट-अ या संवर्गातील पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग,

शासन आदेश क्रमांक: नामनि-१११७/प्र.क्र.१०४/का.१४२७

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १८ मे २०१८

वाचा- १) महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे पत्र क्र.८७८/२३७१/आठ,दि. २७/०९/२०१७
२) नियोजन विभागाचा समक्रमांकाचा आदेश दि.५/२/२०१८
३) विभागाचे पत्र क्रमांक - इएसटी १०१८/प्र.क्र.१६/का.१४२७, दिनांक ५/३/२०१८ व दिनांक ५/४/२०१८
४) श्रीमती के.म.बेलगावकर यांचा विनंती अर्ज दिनांक २३/३/२०१७.

शासन आदेश

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या "उपसंचालक, गट-अ" या पदावरील नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने त्यांच्या संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये ९ उमेदवारांची गुणवत्ता क्रमांकानुसार शिफारस केली आहे. संदर्भाधिन शासन आदेश क्र.२ अन्वये त्यांना उपसंचालक, गट-अ संवर्गातील रिक्त पदावर पदस्थापना देण्यात येऊन आदेशातील परिच्छेद क्र.३ नुसार आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत पदस्थापनेच्या पदावर रुजू होण्याबाबत व ते सदर कालमर्यादेत रुजू न झाल्यास त्यांना नियुक्ती स्विकारावयाची नाही, हे गृहित धरुन त्यांचे नियुक्ती आदेश रद्द करण्यात येतील असे नमूद करण्यात आले होते. सदर ९ उमेदवारांपैकी श्रीमती के.म.बेलगावकर यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना नियुक्ती स्विकारण्यासाठी संदर्भाधिन क्रमांक ३ च्या पत्रान्वये दिनांक ४ मे, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु या वाढीव मुदतीतही श्रीमती के.म.बेलगावकर हया नियुक्तीच्या पदावर रुजू झालेल्या नाहीत. संदर्भाधिन क्रमांक ४ च्या पत्रान्वये श्रीमती के.म.बेलगावकर यांनी वाटप करण्यात आलेला विभागीय संवर्ग बदलून देण्याची विनंती शासनाकडे केली होती. परंतु महसूली विभाग वाटप नियम २०१५ च्या दिनांक २८/४/२०१५ व दिनांक १५/६/२०१७ च्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार श्रीमती के.म.बेलगावकर यांची महसूली विभाग बदलून देण्याची विनंती मान्य करणे शक्य नाही. त्यामुळे संदर्भाधिन क्रमांक २ च्या आदेशान्वये श्रीमती के.म.बेलगावकर यांची उपसंचालक, गट-अ संवर्गातील केलेली नियुक्ती या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहे.

२. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१८१७५७११६२१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Priyanka Ranjan Chhapwale

Digitally signed by Priyanka Ranjan Chhapwale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2295c5c50b6a2aa03b2654fd2f5f69a709a20ae44359c483f3e1b0d4450728d0, cn=Priyanka Ranjan Chhapwale
Date: 2018.05.19 16:46:44 +05'30'

(प्रियांका रं. छापवाले)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्रीमती के.म.बेलगावकर (मार्फत:- अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई)

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-१ व २ मुंबई/ नागपूर
२. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ व २ मुंबई/ नागपूर
३. मा. मंत्री (नियोजन) /मा.राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव
४. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र राज्य विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
५. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने).
६. आयुक्त, मानव विकास आयुक्तालय, औरंगाबाद
७. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती
८. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा
९. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१०. उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय, अमरावती
११. सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, अमरावती
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१४. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, बुलढाणा
१५. जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास), मानव विकास समिती, बुलढाणा
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार अधिकारी यांचे कार्यालय, बुलढाणा
१७. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (का.१२ व १६-ब), मंत्रालय, मुंबई
१८. उपसंचालक (प्रशासन), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१९. अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. निवड नस्ती.